International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 15 January – February - 2026

# महिला व बालविकास विभागाच्या विविध योजनांचा अभ्यास

**प्रदिप लक्ष्मण मेंढापुरे[1], डॉ. लक्ष्मण आबा अवघडे[2]**

*[1]संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र संशोधन केंद्र, अनंतराव थोपटे कॉलेज भोर, पुणे.*
*सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे संलग्नित*
*[2]मार्गदर्शक, असोसिएट प्राध्यापक, अनंतराव थोपटे कॉलेज भोर, पुणे.*
*Corresponding Author – प्रदिप लक्ष्मण मेंढापुरे*

**DOI - 10.5281/zenodo.18864041**

**गोषवारा:**

*देशाचे भविष्य देशातील आदर्श नागरिकांच्या हातात असते.असे आदर्श नागरिक घडविण्यासाठी देशातील महिला व बालकांचा विकास अधिक सक्षमपणे घडून आल्यास देशातील महिलांचा आर्थिक व सामाजिक विकासाच्या स्तर उंचावतो. महिलांना संरक्षण व बालकांना योग्य संस्कार झाले तर ते भविष्यातील देशाचे सुजाण नागरिक बनू शकतात. यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या महिला व बालविकास च्या संदर्भातील विविध योजना सरकार सक्षमपणे राबविताना दिसून येते. महिलांचे सक्षमीकरण बालकांचे पोषण,आरोग्य, संरक्षण, शिक्षण, प्रशिक्षण व कुटुंब कल्याणासाठी विविध योजना याची आखणी व अंमलबजावणी, विविध योजना व कार्यक्रमांच्या माध्यमातून केली जाते. या माध्यमातून कुपोषण व बालमृत्यू कमी करणे. पोषण, आरोग्य व शिक्षण यात सुधारणा करणे. महिला सुरक्षिततेला प्रोत्साहन देणे, असे कुटुंब व समाज कल्याण कार्यक्रम राबविणारी यंत्रणा सक्षम असेल तर,महिला व बालकांचे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य उत्तम राहू शकते.*

**प्रस्तावना :**

भारत हा विविध सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेला देश असून महिलांचा व बालकांचा सर्वांगीण विकास हा राष्ट्राच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. महिलांच्या सक्षमीकरणासोबत बालकांचे आरोग्य पोषण,शिक्षण, संरक्षण, तसेच सामाजिक आर्थिक विकास यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने महिला व बालविकास विभागाची स्थापना केली आहे.या विभागाद्वारे समाजातील दुर्बल घटकांसाठी विविध प्रकारच्या योजना राबविल्या जातात. कुपोषण बालमृत्यू लिंगभेद महिला हिंसा व शिक्षणातील असमानता या समस्यांवर मात करण्यासाठी या योजनांचा मोठा वाटा आहे. यामध्ये शासकीय महिला वस्तीगृह, महिला संरक्षण गृह, आधारगृहे सुधारित माहेर योजना, व्यावसायिक प्रशिक्षणासाठी मुलींना विद्यावेतन, स्वयंरोजगारासाठी महिलांना व्यक्तिगत अनुदान ,निराश्रीत विधवांच्या मुलींसाठी विवाह योजना, अनाथ मुलींच्या विवाह साठी अर्थसहाय्य, देवदासी साठी कल्याणकारी योजना, हुंडा दक्षता समिती, कामधेनू योजना, समुपदेशन केंद्र, घरगुती हिंसाचारापासून संरक्षण कायदा 2005, विदर्भातील अमरावती अकोला बुलढाणा यवतमाळ वाशिम वर्धा या जिल्ह्यातील शेतकरी कुटुंबातील मुलींच्या सामूहिक विवाह साठी योजना अनुदान, बाल विकासाच्या योजनांमध्ये निरीक्षणगृह ,बालगृह, अनुरक्षण गृह ,बाल संगोपन योजना, अनाथलय ,निराधार बालकाश्रम, बालसदन, बाल चिकित्सालय,इतर उपक्रमांमध्ये सकस आहार योजना, एकात्मिक बाल विकास योजना, भिक्षा प्रतिबंधक अधिनियम 1959 विभाग, महिला आर्थिक विकास महामंडळ,स्वयं सिद्ध योजना,यांचा समावेश होतो.सदर

संशोधन पेपर मध्ये महिला व बालविकास विभागाच्या केंद्र व राज्य सरकारच्या प्रमुख योजनांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1. महिला व बालविकास विभागाच्या प्रमुख योजनांचा अभ्यास करणे.
2. महिला व बालकांच्या जीवनावर होणारा परिणाम अभ्यासणे.

**संशोधनाचे महत्व:**

भारतातील महिला व बालकांच्या समस्याचे संपूर्ण निराकरण अजूनही पूर्णपणे झालेले नाही. तसेच अजूनही त्या गंभीर स्वरूपाच्या असल्याचे दिसून येतात. ग्रामीण भागात कुपोषण, शिक्षणातील कमी प्रमाण, महिला हिंसा व आरोग्य सेवा यांचा अभाव, ही प्रमुख आव्हाने दिसून येतात. त्यामुळे सरकारी योजनांचा प्रभाव व परिणाम समजून घेणे आवश्यक आहे. या अभ्यासामुळे धोरण करताना सुधारणा सुचवता येतील. तसेच अभ्यासाकांना सामाजिक विकासाची समज वाढू शकेल.

**संशोधन पद्धती:**

या अभ्यासासाठी दुय्यम माहिती स्रोतांचा वापर करण्यात आला आहे. शासकीय अहवाल, पुस्तके लेख व शासकीय संकेत स्थळे. यांद्वारे माहिती संकलित करण्यात आली आहे.

**विश्लेषण:**

**संकल्पना:**

महिला व बालविकास विभाग हा महिलांचे सामाजिक, आर्थिक,शैक्षणिक,सक्षमीकरण,तसेच बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणारा सरकारी विभाग आहे.

**विभागाची रचना** :- **केंद्र स्तर** : महिला व बाल विकास, **राज्यस्तर** : महिला व बालविकास विभाग ,**जिल्हास्तर** :- जिल्हाधिकारी, **स्थानिक स्तर** :- अंगणवाडी केंद्र.

**महिला व बालविकास विभागाच्या प्रमुख योजना:**

**केंद्र सरकारच्या योजना:**

**1.एकात्मिक बाल विकास सेवा योजना (ICDS):**

ही योजना बालकांचे आरोग्य पोषण व पूर्व शिक्षण सुधारण्यासाठी राबविली जाते. अंगणवाडी केंद्रमार्फत 0 ते 6 वयोगटातील बालकांना पूरक आहार, लसीकरण, आरोग्य तपासणी, व पूर्व प्राथमिक शिक्षण प्रशिक्षण दिले जाते. या योजनेमुळे बालकांच्या कुपोषणावर नियंत्रण मिळविण्यास ही योजना उपयुक्त ठरते. परंतु पायाभूत सुविधा व मनुष्यबळ कमी पडत आहे. PMMVY 2.0 नुसार —

- पहिल्या अपत्यासाठी: एकूण ₹5000 (साधारण 2 हप्ते)
- दुसरे अपत्य मुलगी असल्यास: ₹6000 (एकरकमी) रक्कम थेट बँक खात्यात (DBT) जमा होते

**2. प्रधानमंत्री मातृ वंदना योजना:**

गर्भवती व स्तनदा मातांना आर्थिक सहाय्य देण्याचा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. यामुळे महिलांना योग्य आहार व आरोग्यसेवा घेण्यास प्रोत्साहन मिळते. तसेच त्यांना आर्थिक सहाय्य देऊन मातृ आरोग्य सुधारण्यास वाव मिळतो मातामृत्यू व बालमृत्यू दर कमी करण्यात या योजनेची भूमिका महत्त्वाची आहे. अधिक सक्षम उपयुक्तता येण्यासाठी जनजागृती ची कमतरता जाणवते. 2017 ते 8 जानेवारी 2026 पर्यंत:

4.26 कोटी महिलांना लाभ सुमारे ₹20,060 कोटी रक्कम DBT द्वारे दिली आर्थिक वर्ष 2025-26 (जानेवारी 2026 पर्यंत):59.19 लाख महिलांना लाभ सुमारे ₹2,022 कोटी वितरित

फेशियल बायोमेट्रिक नोंदणी (मे 2025 पासून): सुमारे 23.6 लाख नवीन लाभार्थी

राज्यांनुसार काही उदाहरणे (अलीकडील अंदाज)उत्तर प्रदेश: ~67.15 लाख लाभार्थी

बिहार: ~46.90 लाख, मध्य प्रदेश: ~46.51 लाख, महाराष्ट्र: ~42.61 लाख लाभार्थी योजना सुरू झाल्यापासून 4.26 कोटीपेक्षा जास्त महिलांना लाभ ₹20 हजार कोटीपेक्षा जास्त रक्कम वितरित दरवर्षी लाखो नवीन लाभार्थी जोडले जात आहेत

**3. पोषण अभियान:**

कुपोषण व ऍनिमिया कमी करण्यासाठी बहुआयामी असा हा कार्यक्रम राबविला जातो याचे खास वैशिष्ट्य म्हणजे डिजिटल मॉनिटरिंग सामुदायिक सहभाग आहे. पोषण अभियाना संदर्भात समाजामध्ये जागरूकता वाढविणे गरजेचे आहे. 10.11 कोटीपेक्षा जास्त लाभार्थी नोंदणीकृत (मुले, गर्भवती व स्तनदा माता, किशोरवयीन मुली) जुलै 2025 पर्यंत 72.22 लाख गर्भवती महिला नोंदणीकृत योजना सुरू झाल्यापासून 4.05 कोटींहून अधिक लाभार्थींना मातृत्व संबंधित लाभ सुमारे 10.12 कोटी लाभार्थी डेटा नोंद (2025 पर्यंत) सेवा व कव्हरेज (2025-26 अंदाज) 8 कोटीपेक्षा जास्त मुले पोषण सेवेत समाविष्ट 1 कोटी गर्भवती व स्तनदा माता लाभ घेत आहेत.20 लाख किशोरवयीन मुली योजना अंतर्गत बजेट व आर्थिक माहिती 2025-26 मध्ये सुमारे ₹21,960 कोटी निधी जनजागृती व उपक्रम (2026 पर्यंत)

देशभरात 10.39 कोटीपेक्षा जास्त पोषण कार्यक्रममहाराष्ट्रातच ~ 1.12 कोटीपेक्षा जास्त पोषण

10+ कोटी लाभार्थी नोंदणी कोट्यवधी माता-मुले नियमित पोषण सेवेत आहे .

**4. बेटी बचाओ बेटी पढाओ योजना:**

ही योजना प्रामुख्याने मुलींचा जन्मदर वाढविणे,त्यांच्या शिक्षणास प्रोत्साहन देणे,तसेच आर्थिक व सामाजिक दृष्ट्या सुरक्षितता, संरक्षण याच्याशी निगडित आहे. सामाजिक मानसिकता बदलण्यासाठी ही योजना अत्यंत प्रभावी ठरत आहे.मात्र ग्रामीण भागात अधिकाधिक जनजागृतीची अत्यंत गरज आहे.

Sex Ratio at Birth (SRB) 2015 मध्ये: 918, 2024 पर्यंत: 930 म्हणजे 10 वर्षांत 12 पॉइंट सुधारणा मुलींचा माध्यमिक शिक्षणातील Gross Enrolment Ratio (GER) 2015: 75.51% 2024: 78% मुलींच्या शिक्षणात वाढ संस्थात्मक प्रसूती 2015: 61% 2024: 97.3%+आई-बाळ सुरक्षिततेत मोठी सुधारणा निधी व कार्यक्रम माहिती 2014-2023 दरम्यान BBBP साठी एकूण सुमारे ₹830.57 कोटी निधी वापरला गेला. योजना सुरू होऊन 10 वर्षे पूर्ण (2025) – मुलींच्या संरक्षण व शिक्षणासाठी राष्ट्रीय मोहीम मजबूत आहे.

**5. महिला सक्षमीकरण योजना:**

स्वयंसहायता गट कौशल्य विकास प्रशिक्षण व रोजगार निर्मिती द्वारे महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न या योजनेमार्फत केला जातो महिलांच्या स्वावलंबनात वाढ होत असली तरी प्रशिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा अत्यंत आवश्यक असल्याचे दिसून येते.

**6. मिशन शक्ती (Mission Shakti – Sambal + Samarthya):**

देशभरातील 700+ वन स्टॉप सेंटर (महिला मदत केंद्र) कार्यरत.लाखो महिलांना हिंसाचार, कायदेशीर मदत, समुपदेशन सेवा दिल्या गेल्या.महिला हेल्पलाईन 181 द्वारे कोट्यवधी कॉल्स हाताळले गेले. OSC च्या माध्यमातून घरगुती हिंसा, लैंगिक अत्याचार, छळ, कौटुंबिक हिंसा अशा प्रकरणांमध्ये त्वरित सेवा दिल्या जातात. अनेक राज्यांमध्ये 24x7 हेल्पलाइन व पोलिस-समन्वय सुविधा उपलब्ध आहेत. सेवांचा प्रकार (सामान्य माहिती)आपत्कालीन प्रतिसाद व सुरक्षित निवारा, वैद्यकीय मदत, कायदेशीर सल्ला,मानसोपचार/समुपदेशन,पोलिस व न्यायालयीन मदत समाविष्ट आहे.

**अ. स्वयं सहायता गट (SHG):** दीनदयाल अंत्योदय योजना-NRLM

भारतात 9 कोटींहून अधिक महिला SHG मध्ये सहभागी. 80+ लाख स्वयं सहायता गट सक्रिय. महिलांना सूक्ष्म कर्ज, व्यवसाय प्रशिक्षण, उत्पन्न

**ब. महिला ई-हाट (Mahila e-Haat):**

हजारो महिला उद्योजिकांना ऑनलाईन विक्री व्यासपीठ. स्वयंरोजगार व आर्थिक सक्षमीकरणाला चालना.

**क. उज्ज्वला / स्वाधार गृह योजना**

मानवी तस्करी किंवा संकटग्रस्त महिलांसाठी पुनर्वसन व संरक्षण. देशभरात अनेक निवारा केंद्रे कार्यरत.

**राज्य सरकारच्या योजना:**

**1.माझी कन्या भाग्यश्री योजना:**

मुलींच्या जन्माला व शिक्षणाला प्रोत्साहन देणारी योजना अत्यंत महत्त्वाची आहे.या योजनेमार्फत त्यांना आर्थिक सहाय्य मिळाल्याने मुलींच्या शिक्षणात वाढ होते. महाराष्ट्र सरकारने मुलींच्या शिक्षण व सक्षमीकरणासाठी ही योजना सुरू केली आहे. काही प्रकरणांत ₹50,000 पर्यंत आर्थिक मदत मुलीच्या नावाने जमा केली जाते .पहिल्या मुलीच्या जन्मानंतर कुटुंब नियोजन स्वीकारल्यास आर्थिक रक्कम मुलीच्या खात्यात जमा केली जाते.टप्प्याटप्प्याने लाभ (उदाहरण): जन्मानंतर सुमारे ₹50,000 व शिक्षण सुरू झाल्यावर अतिरिक्त मदत मिळते.18 वर्षे पूर्ण झाल्यावर मोठी रक्कम (काही माहितीप्रमाणे ₹1 लाख+ पर्यंत मिळते.

**2. एकात्मिक बाल विकास सेवा (ICDS):**

बालक, किशोरी मुली, गरोदर व स्तनदा माता यांना सेवा पोषण आहार, आरोग्य तपासणी, लसीकरण, शाळापूर्व शिक्षण व प्रशिक्षण दिले जाते.उदाहरण – धुळे जिल्ह्यात 2024 अंगणवाडी केंद्र कार्यरत राज्यभर ही योजना प्रमुख व सर्वाधिक लाभार्थी असलेली आहे.

**3. महिला कौशल्य व सक्षमीकरण प्रशिक्षण:**

महाराष्ट्रात प्रशिक्षित लाभार्थी(महिला-पुरुष मिळून):एकूण:2,63,937लाभार्थी महिला : 2,17,988

**4. कार्यरत महिला वसतिगृह योजना:**

महाराष्ट्रातील लाभार्थी महिला : 10,704 बाल डे-केअर लाभार्थी : 1,185 आहेत.

**5. महिला बचत गट / आर्थिक सक्षमीकरण:**

2020 पर्यंत 3,200 बचत गट स्थापन महिला आर्थिक विकास महामंडळ (MAVIM) मार्फत अंमलबजावणी केली.

**6. लेक लाडकी / मुली सक्षमीकरण योजना:**

जन्म ते 18 वर्षेपर्यंत सुमारे ₹1.01 लाख आर्थिक मदत मिळते. काही जिल्ह्यांमध्ये हजारो लाभार्थी.

**7. महिला सशक्तीकरण निधी:**

जिल्हा वार्षिक योजनेत 3% निधी महिला-बाल सक्षमीकरणासाठी राखीव आहे.

**8. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना (आर्थिक सक्षमीकरण):**

2.38 कोटी महिला लाभार्थी – डिसेंबर 2024 पर्यंत ₹17,505.90 कोटी निधी वितरित सुमारे ₹1,500 प्रति महिना DBT 2025 मध्ये सुमारे 2.25 कोटी पात्र महिला लाभ घेत असल्याचे आकडे आहेत. पडताळणीत 26.34 लाख अपात्र लाभार्थी आढळले आहे.

**योजनांचे सामाजिक परिणाम:**

1. महिलांचे आरोग्य व आत्मविश्वास वाढला आहे.
2. बालकांचे पोषण व शैक्षणिक स्तर सुधारले आहेत.
3. महिलांचा सामाजिक व आर्थिक सहभाग वाढत आहे.

**अडचणी व मर्यादा:**

1. काही ठिकाणी योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे झालेली आढळून येत नाही.

2. पुरेशा प्रमाणात निधी व मनुष्यबळाची कमतरता जाणवते.
3. लाभार्थ्यांमध्ये माहितीचा अभाव असल्याचे दिसून येते.
4. योग्य नियोजन प्रभावी अंमलबजावणी व जनजागृतीच्या माध्यमातून या योजनांचा लाभ अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविता येईल.

**निष्कर्ष:**

1. महिला व बाल विकास विभागाच्या योजना भारताच्या सामाजिक विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.
2. या योजनांमुळे महिलांचे सक्षमीकरण व बालकांचे आरोग्य सुधारले जाते.
3. प्रभावी अंमलबजावणी व जनजागृती वाढविल्यास या योजनांचा परिणाम अधिक प्रभावीपणे होऊ शकतो.

**संदर्भ:**

1. भारत सरकार महिला व बाल विकास मंत्रालय अहवाल.
2. महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग. राष्ट्रीय पोषण मिशन दस्तऐवज.
3. जिल्हा ,महिला व बाल विकास अधिकारी पुणे
4. www.womenchild.Maharashtra.gov.in
5. www.wcd.nic.in